महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग
राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,
डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

उपसंचालक आरोग्य सेवा
(राआमाजीआका)
तथा उपमुख्य निबंधक
(जन्म व मृत्यू) महाराष्ट्र राज्य

संकेतस्थळ - arogya.maharashtra.gov.in
कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०
मा.सं. विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०
ई-मेल crs_d83@yahoo.com

**परिपत्रक** जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/जमृ नोंदणीबाबतचे महत्व/1168/१९
दिनांकः- 25/3/२०१९

प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक, जन्म व मृत्यू,
जिल्हा परिषद ..............(सर्व)

विषय :- **जन्म व मृत्यु नोंदणी बाबतचे महत्व व जन्म-मृत्यू नोंदणी अहवाल भरताना घ्यावयाची दक्षता या संदर्भात फलक लावणेबाबत.**

उपरोक्त विषयी राज्यात घडणा-या प्रत्येक जन्म व मृत्यू घटनेची नोंदणी जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ आणि महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम २००० अन्वये करण्यात येते.

जन्म व मृत्यू प्रमाणपत्र हे अत्यंत महत्वाचे दस्तावेज असून अनेक महत्वाच्या कामकाजात त्याची आवश्यकता असते. उदा. शाळा प्रवेश, नागरीकत्व, अधिवास प्रमाणपत्र, पारपत्र, संपत्ती वाटप, विमा प्रकरणे, बॅंक खाते, आधार नोंदणी इत्यादी, तसेच सदर प्रमाणपत्र हे निबंधक, जन्म व मृत्यू यांचेकडे संबंधीत घटनेची नोंदणी करताना विहीत नमुन्यात भरुन दिलेल्या माहितीच्या आधारे दिले जाते. सदर माहिती भरताना दक्षता न घेतल्यास वा माहितीत चुका असल्यास त्या प्रमाणपत्रात दिसून येतात व पुढे संबंधीताना चूक लक्षात आल्यावर जन्म व मृत्यू प्रमाणपत्रातील चुका दुरुस्त करण्यासंबंधी प्रकरणे वाढतात व प्रकरणांमध्ये क्लिष्टता वाढू शकते. त्यामुळे लाभार्थीला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

वरील बाबी विचारात घेता सामान्य नागरीकांना जन्म व मृत्यू नोंदणी बाबतचे महत्व तसेच सदर नोंदणीसाठी अहवाल भरताना घ्यावयाची दक्षता या बाबी जर प्रत्येक नोंदणी कार्यालयात व रुग्णालयात फलक स्वरुपात लावल्यास कार्यक्षेत्रातील १००% जन्म व मृत्यू घटनांच्या नोंदी घेणे व नोंदणीच्या वेळी अहवाल अचूक भरणे या बाबी शक्य होतील.

करीता आपणास सूचित करण्यात येते की, नागरी नोंदणी पध्दती अंतर्गत जन्म व मृत्यू नोंदणी कार्य सुधारण्यासाठी जिल्हयातील प्रत्येक निबंधक, जन्म व मृत्यू यांचे कार्यालयात व रुग्णालयात फलक लावणे सक्तीचे करावे. या पत्रासोबत फलकावरील मजकूर जोडण्यात येत आहे.

आपण याबाबत केलेली कार्यवाही या कार्यालयास कळविण्यात यावी.

उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत सविनय सादर -
मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु, महाराष्ट्र राज्य,मुंबई

(कृ.मा.प.)

F:83/Circular.2019

## -: जन्म व मृत्यू नोंदणीचे महत्व :-

| | | |
|---|---|---|
| जन्म नोंदणीचे महत्व | १) | शाळेत प्रवेश घेण्यासाठी |
| | २) | विविध दाखले - अधिवास, नागरीकत्व |
| | ३) | पारपत्र व वाहन परवाना मिळण्यासाठी |
| | ४) | आधार कार्ड अद्ययावत करण्यासाठी |
| | ५) | मतदार यादीत नाव समावेशासाठी |
| | ६) | विवाहाच्या वेळी वर व वधू यांच्या वय निश्चितीसाठी |
| | | |
| मृत्यू नोंदणीचे महत्व | १) | वडीलोपार्जित हक्क आणि संपत्तीचे वाटप याचा निर्णय घेण्यासाठी |
| | २) | विम्याचा दावा मिळण्यासाठी |
| | ३) | कुंटुंब निवृत्ती वेतन मिळण्यासाठी |

## -: जन्म व मृत्यू नोंदणी अहवाल भरताना घ्यावयाची काळजी :-

जन्म व मृत्यू अहवालामध्ये खालील तपशिल काळजीपूर्वक व अचुक भरावा, त्यामुळे भविष्यात त्यात बदल करावा लागणार नाही.

| जन्म | मृत्यू |
|---|---|
| १) जन्म दिनांक | १) मृत्यू दिनांक |
| २) बाळाचे नाव | २) मृत व्यक्तीचे नाव व लिंग |
| ३) लिंग | ३) पती/पत्नीचे नाव |
| ४) आई-वडीलांचे नाव | ४) मृत व्यक्तीचा पत्ता |
| ५) पत्ता | ५) मृत्यूचे ठिकाण |
| ६) जन्माचे ठिकाण | |